

# संदेश...

स्व.अरविंदबाबू देशमुख हे विधायक कार्याचे जनक होते. अनेक गोर-गरीबांच्या शिक्षणाचे आधारस्तंभ म्हणून त्यांनी भूमिका बजावली. म्हणूनच त्यांच्या नावाने भारसिंगी येथे अरविंदबाबू देशमुख महाविद्यालयाची स्थापना केली. ग्रामीण भागातील या महाविद्यालयामध्ये संपूर्ण शैक्षणिक सोयी उपलब्ध करून देण्याचा संस्था पुरेपुर प्रयत्न करीत आहे. आमच्या ग्रामीणच्या विद्यार्थ्यांनी सर्वांगाने विकास करून प्रगतीशिल युगाला सामोर जावे असा आमचा मानस आहे.

या महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करतात हे बघुन आनंद होतो. तसेच क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील मोलाची कामगिरीही वाखान्याजोगी आहे. या नवीन सत्रात येथील कर्मचारी वर्ग अधिकाधीक प्रयत्नांची पराकाष्ठा करून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडवून आणतील तसेच या सत्रात प्रवेश घेणारे विद्यार्थीही प्राध्यापकांना पूर्ण सहकार्य करतील अशी अपेक्षा व्यक्त करीत विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देतो.

रणजीत देशमुख
अध्यक्ष
व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन